**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार**

(गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी )

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औंरगाबाद-४१३ ००१

**तक्रार क्रमांक १३५९ /२०१८ (द्वितीय अपील क्र.२४४८/२०१८ मध्ये)**

श्री. सुधाकर जानु रूपेकर,
रा. महात्मा फुलेनगर, पंढरपुर,
पो. वळदगाव, बजाजनगर, औरंगाबाद **तक्रारदार**

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : **उत्तरवादी**
नायब तहसिलदार,(गृह) ,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

**( सुनावणी दिनांक-२९.०९.२०२१)**

**निर्णय**

तक्रारदार यांनी दि.१२.१२.२०१८ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील क्र.२४४८/२०१८ मध्ये आयोगाने दि.२७.०६.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीची गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल तक्रारदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच सदर नोटीस आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार आज प्रकरणात गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येत आहे. ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, नायब तहसिलदार, (गृह), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद व प्रथम अपिलीय अधिकारी, निंवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद उपस्थित आहेत. तक्रारदार अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, व युक्तीवादावरुन, असे दिसून येते की, सदर तक्रारीमध्ये यापुर्वी दि.१७.०२.२०२० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. तक्रारीची परिपूर्ण सुनावणीसाठी अंतरिम आदेश देण्यात आले. व आज रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दि.२०.०१.२०१७ रोजीच्या पत्रासोबत श्री.सुधाकर जानू रुपेकर, अध्यक्ष विलासभाऊ रुपवते प्रतिष्ठान यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना उदेशून लिहिलेल्या दिनांक २०.१०.२०१६ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

अर्जदारांनी सोबतच्या पत्रात नमूद केलेलया बाबीनुषंगाने आवश्यक कार्यवाही सत्वर करावी, ही विंनती. कक्ष अधिकारी ,महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई यांनी कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. यावर तक्रारदार यांनी दि.२८.११.२०१७ रोजी माहिती अर्ज केला त्यासंबधीची माहिती मागितली.त्यावर जन माहिती अधिकारी तथा गृह शाखा ,जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांनी दि.०५.१२.२०१७ रोजी चूकीची माहिती देऊन कळविले आहे की, मागिल वर्षभरापासुन कोणत्याही प्रकारचे सी.एम.ओ .टपाल प्राप्त झालेले नाही. कक्ष अधिकारी मंत्रालय मुंबई यांच्याकडून सदर टपालाच्या प्रती मागविण्यात आल्या आहेत. सदर पत्र शासनाकडून दि.२४.०४.२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवक शाखेला प्राप्त झाले ते गृह शाखा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी निर्देशित केले. गृहशाखा यांनी ते पत्र तहसीलदार, (संगायो विभाग ) यांच्याकडे वर्ग करण्यात आले. त्यांची एक प्रत अर्जदार यांना उपलब्ध करुन देण्यात आली.दि.०३ नोव्हेंबर,२०१८ रोजीचे अपिल क्र २४४८/२०१८ दि.२२.०९.२०१८ निर्णयाचे प्रत सह महाराष्ट्र शासनाचे पत्र दि.१७.११.२०१८ रोजी प्राप्त झाले ते संगायो शाखेकडे निर्देशित करण्यात आले. ते संगायो विभागाने परत गृह शाखेकडे पाठविले. यामध्ये मोठयाप्रमाणात कालापव्य झाल्याचे दिसून येत आहे.

कार्यालयार्तंगत जो पत्रव्यवहार होतो तो करत असतांना मूळ पदनाम त्यावर कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नावाने होणे आवश्यक होता. त्या ठिकाणी जिल्हादंडाधिकारी औरंगाबाद करिता स्वाक्षरी करुन पत्रव्यवहार करण्यात आला, यामुळे या प्रकरणाची जबाबदारी निश्चित करताना अधिकारी/ कर्मचारी कोण आहेत हे निश्चित करतांना अडचणी निर्माण होतात. परंतु यामध्ये सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -२०१६/प्र.क्र.२९/१८(र.व का.) मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबइ्र -४०००३२ दि.१०फेबुरवारी,२०१६ मध्ये कार्यालयीन कार्यपध्दती नियमपुस्तिकेतील ५३(८) येथील तरतुदीनुसार शासकीय पत्रे निर्गमित करताना पत्रावर स्वाक्षरी करणा-या अधिका-याने स्वाक्षरीखाली कंसामध्ये नाव व त्याखाली पदनामाचा उल्लेख करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. निर्देशाचे पालन सुयोग्य प्रशासनासाठी आवश्यक आहे. ते याप्रकरणामध्ये झाल्याचे दिसून येत नाही.

त्यामुळे व्दितीय अपील सुनावणीच्या वेळी आयोगाची दिशाभूल करण्यात आली.मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडून पत्रव्यवहार प्राप्त असताना त्यासोबतचे सहपत्र सोबत असतांना सुदधा ते प्राप्त नाही म्हणून शासनाकडे पत्रव्यवहार करुन अमूल्य वेळेचा दुरुपयोग करण्यात आला. त्यामुळे अर्जदाराला त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित रावे लागले आहे. ही बाब खेदजनक आहे. याकरिता कलम १९(८)(क)१९(७) नुसार प्राप्त अधिकारानुसार जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी या सर्व बाबीसाठी जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांना आपल्या स्तरावरुन समज दयावी.सदर पत्रावर प्रचलित शासन नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन संबधित अर्जदारास सदयस्थिती कळविण्यात यावी. या निर्देशासह विचाराधीन तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त विवेचनाच्या अधिन राहून विचाराधिन तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

**( दिलीप ल. धारुरकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

जावक क्र. 712 दि. 11/2/2022

**प्रत** :- माहिती तथा कार्यवाही / अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,(गृह) , जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना मार्फत जिल्हाधिकारी ,जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद